2 9 JUN 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पत्रकारितेतून गुन्हेगारीचे उदात्तीकरण नको

## पोलिस उपायुक्त मितेश घट्टे; डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे ऑनलाईन व्याख्यान

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



पत्रकारितेला मोठी परंपरा आणि ऐतिहासिक वारसा आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून कोणत्याही गुन्हेगाराचे उदात्तीकरण होऊ नये, असे आवाहन पुण्याचे पोलिस उपायुक्त मितेश घट्टे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने आयोजित 'गुन्हेगारी बातम्या आणि पत्रकारांची जबाबदारी' या विषयावरील ऑनलाईन व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते.

उपायुक्त घट्टे म्हणाले, पत्रकारांनी कायद्याचा अभ्यास केला पाहिजे. काळानुरूप गुन्ह्यांच्या स्वरूपात बदल होत आहे. या बदलाची नोंद पत्रकारांनी घ्यावी. निष्पक्ष, तटस्थ व जबाबदार पत्रकारिता समाजाला पुढे घेऊन जाते. पत्रकारांना माहिती मिळविण्यासाठी अनेक स्रोतांची मदत घ्यावी लागते. परंतु, ही माहिती वस्तुनिष्ठ आहे का, याचा विचार पत्रकारांनी करायला हवा. पोलिस यंत्रणा पत्रकारांना अधिकृत माहिती देते. या माहितीवर पत्रकारांनी विश्वास ठेवणे गरजेचे आहे.

सूत्रांची माहिती किंवा ऐकीव माहिती दिल्याने अनेकवेळा गोंधळाची परिस्थिती निर्माण होते. माहितीची खात्री होणार नसेल तर अशी माहिती टाळणे योग्य ठरेल. घाईने माहिती देणे अंगलट येऊ शकते. कोणत्याही घटनेचा विविध अंगाने परामर्श घेणेही तितकेच गरजेचे आहे. अलीकडे सोशल मीडियाच्या माध्यमातून विकृती जन्माला येऊ पाहत आहे. आर्थिक फसवणुकीसह अनेक प्रकारची व्हाईट कॉलर गुन्हेगारी वाढताना दिसत आहे. अशावेळी पत्रकारांबरोबर पोलिस प्रशासनाची जबाबदारी वाढली आहे. पोलिस व पत्रकार यांनी एकत्र येऊन अशा अपप्रवृत्तींचा मुकाबला करणे आवश्यक आहे. पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनी भविष्यात गुन्हेविषयक पत्रकारिता करताना संवेदनशीलपणे प्रत्येक घटनेकडे पाहावे, असे आवाहन घट्टे यांनी केले.

अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले. ऑनलाईन व्याख्यानास कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील पत्रकारांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 9 JUN 2021
पुढारी

# तंत्रज्ञान विभागांतर्गत सिव्हिल इंजिनिअरिंग विषयावर वेबिनार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

तांत्रिक कौशल्य, संवाद कौशल्य आणि सादरीकरण यांची सिव्हिल इंजिनिअरिंग रोजगार निर्मितीसाठी नितांत आवश्यकता आहे, असे प्रतिपादन इंजिनिअर शुभम लेवारकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान विभागांतर्गत स्थापत्य अभियांत्रिकी शाखेत 'करियर अपॉर्च्युनिटी इन सिव्हिल इंजिनिअरिंग' या विषयावर वेबिनारमध्ये ते बोलत होते. सहायक प्राध्यापक डॉ. पी. पी. फडणीस यांनी स्वागत केले. सहायक प्रा. महेश साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. सहायक प्राध्यापक एस. एम. पटवेगार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 9 JUN 2021
पुढारी

# विद्यापीठात आजपासून 'फॅक्ट चेकिंग अँड व्हेरीफिकेशन' विषयावर कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम व मास कम्युनिकेशन विभाग आणि प्रेस क्लब ऑफ कोल्हापूर याच्या संयुक्त विद्यमाने २९ व ३० जून रोजी 'गुगल न्यूज इनिशिएटिव्ह फॅक्ट चेकिंग अँड व्हेरीफिकेशन' या विषयावर दोन दिवशीय ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यशाळेत गुगल न्यूज इनिशिएटिव्हच्या वतीने नुपूर सोनार मार्गदर्शन करणार आहेत. प्राध्यापक, संशोधक, पत्रकार आणि विद्यार्थ्यांनी कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JUN 2021
सकाळ

# विद्यापीठात आज, उद्या ऑनलाईन कार्यशाळा

## प्रेस क्लब व जर्नालिझम विभागातर्फे आयोजन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभाग आणि प्रेस क्लबतर्फे गुगल मिटद्वारे मंगळवार(ता. २९) आणि बुधवार (ता.३०) रोजी 'गुगल न्यूज इनिशिएटिव्ह फॅक्ट चेकिंग अँड व्हेरिफिकेशन' या विषयावर दोनदिवसीय ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेसाठी गुगल न्यूज इनिशिएटिव्हतर्फे नुपूर सोनार मार्गदर्शन करतील. यात माहिती, फोटो आणि व्हिडिओची सत्यता पडताळणी, बातमीचे स्त्रोत या विषयीचे विश्लेषण आणि पडताळणी करणे, फेसबुक, ट्विटर, यूट्यूब आणि वेबसाइट्स या विषयावर कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. कार्यशाळेसाठी https://forms.gle/9nFqfPuyrHULNyHb7 या लिंकवरून नाव नोंदणी करावी. त्यानंतर प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. प्राध्यापक, संशोधक, पत्रकार आणि विद्यार्थ्यांसाठी ही कार्यशाळा उपयुक्त आहे.

या कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JUN 2021
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात आजपासून कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभाग आणि कोल्हापूर प्रेस क्लबतर्फे आज, मंगळवारी आणि बुधवारी 'गुगल न्यूज इनिशिएटिव्ह फॅक्ट चेकिंग अँड व्हेरिफिकेशन' या विषयावर ऑनलाईन कार्यशाळा आयोजित केली आहे. त्यामध्ये गुगल न्यूज इनिशिएटिव्हच्या वतीने नूपुर सोनार या मार्गदर्शन करणार आहेत.

माहिती, फोटो आणि व्हिडिओची सत्यता पडताळणी करणे, बातमीचे स्रोत याविषयीचे विश्लेषण आणि पडताळणी करणे, फेसबुक, ट्विटर, यूट्यूब आणि वेबसाईट्स या विषयावरही कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात येणार आहेत. कार्यशाळेतील सहभागासाठी (https://forms.gle/9nFqfPuyrHULNyHb7 )या लिंकवरून नावनोंदणी करणे आवश्यक आहे. प्राध्यापक, संशोधक, पत्रकार, विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे.